Publication : Dainik Shivner
Date: December 23, 2020

# सोमानी होम इनोव्हेशन लिमिटेडचा स्वच्छता आणि जंतुनाशकांच्या क्षेत्रात प्रवेश

नवी दिल्ली, दि. २३ : हिंदवेअर अप्लायन्सेसचे निमति असलेल्या सोमानी इनोव्हेशन लिमिटडने विद्यमान कोविड- च्या संकटाला प्रतिसाद म्हणून सुरक्षेसाठी अत्यावश्यक उत्पादनांच्या क्षेत्रात प्रवेश केला असून त्यांनी हिंदवेअर ॲक्टिव्हिओ फूड स्टरलायझर आणि हिंदवेअर पर्ज सरफेस डिसइन्फेक्टंट जनरेटर अशा जंतुनाशक उत्पादनांचे अनावरण केले आहे. या दोन्हींची किंमत अनुक्रमे रूपये आणि रूपये असून ते हिंदवेअरचे ॲक्टिव्हिओ मेट्रो कॅश ॲंड कॅरी स्टोअर्समध्ये तसेच भारतभरातील सामान्य रिटेल दुकानांत आणि हिंदवेअरचे पर्ज इवोक.इन, क्रोमा आणि रिलायन्समध्ये उपलब्ध आहेत. ही उत्पादने लवकरच फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन.इनवरही उपलब्ध होतील. ग्राहकांचे आरोग्य आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य देत असताना या कंपनीने तंत्रज्ञानात्मक उत्पादने तयार करण्यासाठी आपल्या संशोधन आणि विकासात गुंतवणूक केली आहे. त्यांनी भारतीय ग्राहकांना विषाणू आणि आजारांचा सामना करण्यासाठी जंतुनाशके आणली आहेत.

सध्याच्या चालू असलेल्या जागतिक साथीमुळे संस्था आणि लोकांवरही प्रभाव पडला आहे. त्यामुळे लोकांचे जगणे, काम, अभ्यास यांच्या पद्धती बदलल्या असून सोशल डिस्टन्सिंगद्वारे संवाद साधण्याची सवय लागली आहे. विषाणू आणि जीवाणू नष्ट करण्यासाठी सोमानी होम इनोव्हेशन लिमिटडने ॲक्टिव्हिओ बाय हिंदवेअर आणला आहे. हा ताज्या भाज्या, मटण आणि कटलरी स्वच्छ करण्यासाठी फूड स्टेरिलायझर आहे. एकूण लीटर क्षमतेने सुसज्ज असलेले हे उपकरण पूर्णपणे नैसर्गिक ओझोन प्युरिफिकेशन तंत्रज्ञानाचा वापर करते आणि कीटकनाशक, जंतू, प्रिझर्वेटिव्ह आणि फळे पिकवणा-या घटकांना नष्ट करते. ते प्रत्येक उत्पादनाची प्रत्येक बाजू सखोलपणे स्वच्छ आणि निर्जंतुक करते. हे सामान्य पद्धतीने धुतल्याने शक्य होत नाही. विशेषतः तयार केलेल्या एअर बर्स्ट स्टोनने सज्ज असलेले ॲक्टिव्हिओ फळे तसेच भाजांच्या पृष्ठभागावरील बाह्य निक्षेप काढण्यासाठी सूक्ष्म फेस तयार करते आणि मोठे आजार, संसर्ग व अवयवांचे आजार यांना कारण ठरणारे विषारी घटक काढून टाकते.

पर्ज हे दुसरे उत्पादन पृष्ठभागीय जंतुनाशक जनरेटर असून तीन मिनिटांपेक्षा कमी काळात ते शुद्ध पाण्याचा वापर करून जंतुनाशकांचे द्रावण तयार करते. हे द्रावण फर्निचर, घरगुती उपकरणे, बाथटब, कीबोर्ड, माऊस, गाड्या, फळे आणि भाज्या, भांडी इत्यादी विविध प्रकारच्या पृष्ठभागांवर फवारता येईल. पर्जला टीयूव्ही-एसयूडी साऊथ एशिया प्रा. लि.कडून टक्के मर्यादित प्रभावशाली पद्धतीने विषाणू काढण्यासाठी तपासणी करून प्रमाणित केलेले आहे.

या अनावरणाबाबत बोलताना राकेश कौल, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक, सोमानी होम इनोव्हेशन लिमिटेड म्हणाले की, कोविड- मुळे मानवी जीवनशैलीची मूलभूत तत्वे बदलली आहेत. सोशल डिस्टन्सिंग, मास्क आणि स्वच्छता या गोष्टी आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग बनल्या आहेत. ग्राहकांच्या सवयींमधील हा बदल आपल्याकडे कायम राहणार आहे आणि स्वच्छतेबाबत लोकभावना वाढीस लागली असताना जंतुनाशक उत्पादने, अन्न स्टेरिलायझर्स आणि पृष्ठभाग जंतुनाशक जनरेटर्सच्या मागणी-पुरवठ्यात मोठी दरी निर्माण झाली आहे. सोमानी होम इनोव्हेशन लिमिटेडमध्ये आमच्या ग्राहकांचे आरोग्य आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्याचे ठरते. पर्ज आणि ॲक्टिव्हिओच्या अनावरणासोबत आम्हाला आशा आहे की, आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रातील ही दरी आम्ही कमी करू शकू. आम्हाला या अनावरणाला बाजारातून मोठा प्रतिसाद मिळेल, अशी आशा आहे. कारण ग्राहक अत्यंत प्रभावशाली स्वच्छता उत्पादनांच्या शोधात आहेत.

ॲक्टिव्हिओ फूड स्टरलायझरमध्ये ३ पूर्वनिश्चित फंक्शन्स आहेत. त्यातून वापरकर्त्यांना ताजा शेतमाल, मटण आणि भांडी स्वच्छ करणे शक्य होते. हे उपकरण १० लीटर क्षमतेसोबत येत असल्यामुळे तुम्हाला तुमचा किराणा साफ करण्यासाठी जास्तीचा बाऊल ठेवण्याची गरज नाही. त्यामुळे तुमचा जंतूंशी संपर्क किमान होईल, याची काळजी घेतली जाईल.